सत्यमेव जयते

**सुधीर स. मुनगंटीवार**
विधानसभा सदस्य
माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)

जा.क्रं.३३९६/कार्या./२०२०
दिनांक : १९.९.२०२०

प्रती,

मा. ना. दादाजी भुसे
कृषी मंत्री
महाराष्ट्र शासन, मंत्रालय
मुंबई-३२

सप्रेम नमस्कार,

विषय: विदर्भातील सोयाबिन पिकाच्या झालेल्या नुकसानाची भरपाई तातडीने मिळण्याबाबत.

महोदय,

विदर्भातील चंद्रपूर, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ, अमरावती आदी जिल्हयांमध्ये सोयाबिन पिकावर अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे तसेच वातावरणात झालेल्या बदलामुळे सोयाबिन पिकाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही जिल्हयात १०० टक्के, काही जिल्हयात ८० टक्के तर काही जिल्हयात ९० टक्के नुकसानाचा सामना सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांना करावा लागला आहे. आधीच आर्थिक अडचणीचत असलेला सोयाबिन उत्पादक शेतकरी हातचे पिक गेल्यामुळे हवालदील झाला आहे. या सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांना शासनातर्फे मदतीचा हात मिळणे आवश्यक आहे. परंतु शासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरु होण्याची भिती नाकारता येत नाही. सदर सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. शासनाचे याकडे गांभीर्याने बघण्याची आवश्यकता आहे.

कृपया आपण जातीने लक्ष घालुन याबाबत त्वरीत योग्य कार्यवाहीसाठी संबंधितांना आदेश द्यावेत, ही विनंती.

कार्यवाहीची सविस्तर रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :
मा. आ. समिरजी कुणावार, हिंगणघाट, जि. वर्धा

गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी : (कार्या.) ०७१७२-२५२५८२,
फॅक्स : ०७१७२ - २५८८००, ७७२२०७४१९९, अजय धवने स्वीय सहा. ९८२२५६५९२६,
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in, ajayd852@gmail.com, bjp03069@gmail.com 9552799608

सत्यमेव जयते

**सुधीर स. मुनगंटीवार**

विधानसभा सदस्य

माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)

जा.क्र. ३३७८/सचिवे/२०२०

दिनांक : १९.९.२०२०

प्रती,

मा. ना. उध्दवजी ठाकरे

मुख्यमंत्री

महाराष्ट्र शासन, मंत्रालय

मुंबई-३२

सप्रेम नमस्कार,

विषय: विदर्भातील सोयाबिन पिकाच्या झालेल्या नुकसानाची भरपाई तातडीने मिळण्याबाबत.

महोदय,

विदर्भातील चंद्रपूर, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ, अमरावती आदी जिल्हयांमध्ये सोयाबिन पिकावर अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे तसेच वातावरणात झालेल्या बदलामुळे सोयाबिन पिकाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही जिल्हयात १०० टक्के, काही जिल्हयात ८० टक्के तर काही जिल्हयात ९० टक्के नुकसानाचा सामना सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांना करावा लागला आहे. आधीच आर्थिक अडचणीचत असलेला सोयाबिन उत्पादक शेतकरी हातचे पिक गेल्यामुळे हवालदील झाला आहे. या सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांना शासनातर्फे मदतीचा हात मिळणे आवश्यक आहे. परंतु शासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरु होण्याची भिती नाकारता येत नाही. सदर सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. शासनाचे याकडे गांभीर्याने बघण्याची आवश्यकता आहे.

कृपया आपण जातीने लक्ष घालुन याबाबत त्वरीत योग्य कार्यवाहीसाठी संबंधितांना आदेश द्यावेत, ही विनंती.

कार्यवाहीची सविस्तर रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

मा. आ. समिरजी कुणावार, हिंगणघाट, जि. वर्धा

गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी : (कार्या.) ०७१७२-२५२५८२,

फॅक्स : ०७१७२ - २५८८००, ७७२२०७४१९९, अजय धवने स्वीय सहा. ९८२२५६५९२६,

Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in, ajayd852@gmail.com, bjp03069@gmail.com 9552799608